पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, संचलित,

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

## ता. फुलंब्री जि. औरंगाबाद

नॅक मुल्यांकनात 'ब' दर्जा प्राप्त

# वार्षिक अहवाल

## शैक्षणिक वर्ष :- २०१८-२०१९

## लहुजी साळवे बाल संस्कार केंद्र

प्राचार्य
डॉ. एस. आर .टकले

विभाग प्रमुख
डॉ. मंजुषा नळगीरकर

# श्री संत सावता माळी ग्रामीण महाविद्यालय फुलंब्री

ता. फुलंब्री जि. औरंगाबाद

वार्षिक अहवाल - (शै. वर्ष २०१८-१९)

## "लहुजी साळवे बाल संस्कार केंद्र"

शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये महाविद्यालयाच्या वतीने चालविल्या जाणा-या लहुजी साळवे बाल संस्कार केंदाचे मासिक वेळापत्रक तयार करुन लावण्यात आले. महाविद्यालयातील सर्वच प्राध्यापकांनी नेमून दिलेल्या दिवशी संस्कार केंद्रावर जावून अध्यापनाचे कार्य केले आहे. तसेच वर्षभरात बाल संस्कार केंद्रात पुढील कार्यकम घेण्यात आले आहेत.

**रक्षाबंधन कार्यकम:-**

लहुजी साळवे बाल संस्कार केंद्रातील लहान मुलांना दि. २० ऑगस्ट २०१८ रोजी राख्या बांधून खाऊ वाटप करण्यात आला. शदरील रक्षाबंधन कार्यक्रमात महाविद्यलयातील डॉ. संजीव कुमार पांचाळ, प्रा. नितीन माळेगावकर, डॉ. मंजुषा नळगीरकर आणि विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

**चित्रकला स्पर्धा:-**

संस्कार केंद्रातील बालकांसाठी दिनांक ०१ सप्टेंबर २०१८ रोजी चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सदरील स्पर्धेत १५ मुलांनी सहभाग घेतला होता. ज्यापैकी सलोनी गणेश तुपे व किर्ती सतीश खरात यांनी अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविला होता.

**बाल आरोग्य तपासणी शिबीर :-**

लहुजी साळवे बाल संस्कार केंद्रातील मुलांसाठी आणि साठे नगर परिसरातील मुलांसाठी दि. २२ सप्टेंबर २०१८ रोजी बाल आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. बाल आरोग्य तपासणी शिबिराच्या उद्‌घाटन कार्यक्रमात डॉ. निती म्हस्के (वैद्यकीय अधिकारी, फुलंब्री) यांनी बालकांच्या आरोग्याची आणि आहाराची कशी काळजी घ्यावी, या संबंधी शिबिरास आलेल्या मातांना मार्गदर्शन केले. शिबीर उद्‌घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. आर. टकले यांनी भुषविले. सदरील आरोग्य तपासणीत डॉ. निती म्हस्के व अंगणवाडी सेविका शाहीन पटेल यांनी ४४ बालकांची तपासणी करण्यात आली.

**संगणक प्रशिक्षण :-**

दि. १३ ऑक्टोबर २०१८ रोजी संस्कार केंद्रातील मुलांना महाविद्यालयात बोलावून प्रा. विजय पांडे यांनी संगणक कक्षात मुलांना संगणकाची ओळख करुन दिली. तसेच संगणक कसे हाताळावयाचे याचे सोप्या पद्धतीने मुलांना प्रशिक्षण दिले.

**कपडे वाटप :-**

डॉ. अश्विन रांजणीकर यांनी नवरात्र महोत्सवाचे औचित्यसाधून संस्कार केंद्रातील पाच कुमारिकांना कपडे घेऊन दिले.

**संगणकद्वारे अध्यापन :-**

संस्कारकेंद्रातील मुलांमध्ये अध्यापनाची आवड निर्माण व्हावी म्हणून काही प्राध्यापक डॉ. दत्तात्रय येडले, प्रा. विजय पांडे, डॉ. महेश थोरात यांनी संगणकाद्वारे अध्यापन केले.

**खेळाच्या स्पर्धा :-**

संस्कार केंद्रातील मुलांना महाविद्यालयात बोलावून दि. १६ फेब्रुवारी २०१९ रोजी विविध खेळाच्या स्पर्धा घेण्यात आल्या. ज्यात धावणे, लिंबु चमचा, लंगडी व संगीत खूर्ची यांचा समावेश होता. सदरील खेळाच्या स्पर्धेत १७ मुलांनी सहभाग घेतला होता.

**धावणे – मोठे मुले गट**

प्रथम - अंजली संतोष तुपे
द्वितीय - सलोनी गणेश तुपे
तृतीय - रुपाली तुपे

**धावणे – छोटे मुले**

प्रथम - ऋषिकेश गणेश तुपे
द्वितीय - नेहा साहेबराव बनसोडे
तृतीय - राखी राजु भालेराव

**लिंबू चमचा – मोठे मुले**

प्रथम - अंजली संतोष तुपे
द्वितीय - सलोनी गणेश तुपे

**लिंबू चमचा – छोटे मुले**

प्रथम - नेहा पांडुरंग तुपे
द्वितीय - सोनाली साईनाथ शेजवळ

**लंगडी – मोठे मुले**

प्रथम - अंजली संतोष तुपे
द्वितीय - रागीणी राजेंद्र तुपे
तृतीय - सलोनी गणेश तुपे

**लंगडी – छोटे मुले**

प्रथम - राखी राजू भालेराव
द्वितीय - नेहा पांडुरंग तुपे
तृतीय - नेहा साहेबराव बनसोडे

**संगीत खूर्ची – मोठे मुले**

प्रथम - अंजली संतोष तुपे

द्वितीय - सलोनी गणेश तुपे

तृतीय - पूजा राजू भालेराव

**संगीत खूर्ची – छोटे मुले**

प्रथम - ऋषिकेश गणेश तुपे

द्वितीय - नेहा साहेबराव बनसोडे

तृतीय - नेहा पांडुरंग तुपे

**वार्षिक स्नेहसंमेलन:-**

बाल संस्कार केंद्रातील मुलांचे वार्षिक स्नेहसंमेलन दि. ०९ मार्च २०१९ रोजी घेण्यात आले. वार्षिक स्नेहसंमेलनात २० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. एकूण १२ गाणे सादर करण्यात आले.

# लहुजी साळवे बाल संस्कार केंद्र

शैक्षणिक वर्ष : २०१८-१९

## कार्यक्रमाची छायाचित्रे

### बाल आरोग्य तपासणी शिबीर





दि. २२ सप्टेंबर २०१८ रोजी बाल आरोग्य तपासणी शिबिरात मार्गदर्शन करतांना वैद्यकीय अधिकारी डॉ. निती म्हस्के मॅडम

दि. २२ सप्टेंबर २०१८ रोजी बाल आरोग्य तपासणी शिबिरात मुलांची उंची मोजतांना अंगणवाडी सेविका शाहीन पटेल मॅडम







दि. २२ सप्टेंबर २०१८ रोजी बाल आरोग्य तपासणी शिबिरात आरोग्य तपासणी करतांना वैद्यकीय अधिकारी डॉ. निती म्हस्के मॅडम

### चित्रकला स्पर्धा







दि. ०१ सप्टेंबर २०१८ रोजी चित्रकला स्पर्धेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना डॉ. मंजुषा नळगीरकर

## रक्षाबंधन कार्यक्रम



रक्षाबंधन दिनानिमित्त संस्कार केंद्रातील बालकांना राखी बांधतांना डॉ. मंजुषा नळगीरकर, विद्यार्थींनी

## संगणक प्रशिक्षण



दि. १३ ऑक्टोबर २०१८ रोजी संगणक कसे वापरायचे? या बद्दल मार्गदर्शन करतांना प्रा. विजय पांडे

## संगणकाद्वारे अध्यापन




संगणकावर बोधपर कथा पाहतांना संस्कार केंद्रातील बालके

# खेळाच्या स्पर्धा



दि. १६ फेब्रुवारी २०१९ रोजी लिंबु चमचा स्पर्धेत स्पर्धक विद्यार्थी



दि. १६ फेब्रुवारी २०१९ रोजी धावणे या स्पर्धेतील स्पर्धक विद्यार्थी



दि. १६ फेब्रुवारी २०१९ रोजी संगीत खुर्ची या स्पर्धेतील स्पर्धक विद्यार्थी



दि. १६ फेब्रुवारी २०१९ रोजी लंगडी या स्पर्धेतील स्पर्धक विद्यार्थी

# वार्षिक स्नेहसंमेलन















लहुजी साळवे बाल संस्कार केंद्रात दि. ९ मार्च २०१९ रोजी वार्षिक स्नेहसंमेलनात सहभागी बालके आणि बक्षिस वितरण करतांना डॉ. मंजूषा नळगीरकर